# मंगेशकर्स!

## लतादिदीच सर्वश्रेष्ठ गायिका -आशा भोसले

**दीनानाथ स्मृती पुरस्कार प्रदान**

**ठाणे, २४ एप्रिल/प्रतिनिधी**



जिचे केस जमिनीला टेकतात आणि आवाज आभाळात भरारी घेतो, ती माझी दिदी अर्थात भारतरत्न लता मंगेशकर ही जगातील सर्वश्रेष्ठ गायिका आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी आज येथील सेंट्रल मैदानात आयोजित दीनानाथ स्मृती पुरस्कार वितरण सोहळयाप्रसंगी केले. आम्ही सर्व मंगेशकर भावंडे एका व्यासपीठावर पाहून माझ्याप्रमाणे तुम्हालाही आनंद झाला असेल असे म्हणत त्यांनी दीनानाथांचे ‘शूरा मी वंदिले' गायिले, तेव्हा रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. ‘तुम जियो हजारो साल, साल ते दिन हो पचास हजार' असे म्हणत सचिन तेंडुलकरला त्याच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

विहंग ग्रुप ऑफ कंपनीज् आणि संस्कृती युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एका शानदार सोहळ्यात लता, आशा, मीना, उषा आणि हृदयनाथ या सर्व मंगेशकर भावंडांच्या उपस्थितीत हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने दीनानाथ स्मृती पुरस्कार लता मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. बुजूर्ग गायक उस्ताद गुलाम मुस्तफा खान (मास्टर दीनानाथ), सुयोग नाटय़संस्थेचे सुधीर भट (मोहन वाघ स्मृती), ‘इमेज वेल्फेअर अ‍ॅचिव्हर्स फोरम-ठाणे'चे नितीन विरखरे (आनंदमयी पुरस्कार), ज्येष्ठ गायक प्रसाद सावकर (विशेष पुरस्कार), ज्येष्ठ नाटककार महेश

एलकुंचवार (वाङविलासिनी), सिने अभिनेता धर्मेंद्र (विशेष पुरस्कार) आणि प्रा. प्रवीण दवणे (शांता शेळके सरस्वती पुरस्कार) हे यंदाच्या पुरस्कारांचे मानकरी होते. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे, युवासेना अध्यक्ष आदित्य ठाकरे आणि इतरांच्या उपस्थितीत सर्व मंगेशकर भावडांचा ठाण्यातील कौपीनेश्वर मंदिरात खास अभिषेक केलेल्या मंगेशीच्या मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने लता मंगेशकर तब्बल २५ वर्षांनंतर ठाण्यात आल्या. त्यांना पाहण्यासाठी हजारो ठाणेकरांनी सेंट्रल मैदानावर हजेरी लावली होती. त्याबद्दल लतादिदींनी ठाणेकरांचे आभार मानले. जग बदलले तरी आम्ही बदललो नाही, असेही त्यांनी त्यांच्या छोटेखानी भाषणात नमूद केले. याच कार्यक्रमात आमदार प्रताप सरनाईक यांच्या ‘मुंबई फास्ट' या बेकरी उत्पादन साखळी दुकानांचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.  त्यानंतर हृदयनाथ मंगेशकर, राधा मंगेशकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी ‘शिवकल्याण राजा' हा शिवकथा आणि गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमादरम्यान विविध दैनिकांच्या संपादकांच्या हस्ते संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिवगौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रतिकुल परिस्थितीत उद्योग व्यवसायात प्रगती करणाऱ्या प्राजक्ता पाटील, अभय वर्दे, संगीता वैती, गणेश सामंत, मंदार जोगळेकर, विजय सोनावणे, ऋजुता दिवेकर, आमदार सा.रे.पाटील, विक्रम फडणवीस, प्रतिभा जोशी, पल्लवी पालकर आणि प्रसाद फणसगांवकर यांना यंदा या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. सुधीर गाडगीळ आणि धनश्री लेले यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.